नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २९/०९/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत बायपास चौक गीरड रोड, उमरेड येथे दिनांक २४/०९/२०२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– हरीदास पुरूषोत्तम चव्हाण वय ३६ वर्ष रा मांडवा ता भिवापुर हे उमरेड ला एल आय सी चे कामाकरीता गीरड रोड बायपास चौक उमरेड येथे आले व तिथे आपली एमएच– ४०/सीएल–२३८९ क्रमांकाची टीव्हीएस कंपनीची रॅडीओन मोटरसायकल ठेवुन १५ ते २० मिनीटाकरीता गाडी ठेवलेल्या ठीकाणी येउन पाहले तर गाडी दिसुन आली नाही. ०२ दिवस आजुबाजुचे परीसरात शोध केला असता मिळुन आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमत ८६,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा आनंद धात्रक मो.न. ९५४५३५५४७० हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा** :– दिनांक २८/०९/२०२२ चे १६.३० वा. ते १७.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय ३७ वर्ष यांचे पती बाजारातुन घरी आले व आरोपी क्र. १. प्रवीन कोसरे वय ३२ वर्ष हा तेथे आल्याने फिर्यादी व तिचे पतीने त्याला समजावत होते की, 'आमचे घर रोडला लागुन असल्याने रोडवरच उभे असता' यातील आरोपी क्र. २.धीरज गोवर्धन बनसोड, वय ३५ वर्ष २. दोन्ही रा. पीपळधरा त. नरखेड हा तेथे येउन अश्लिल शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी देउन दोन थापडा फिर्यादीच्या पतीला मारल्या. त्यावरून फिर्यादीची सासु हि फिर्यादीचे पतीला का मारता म्हणुन झगडा सोडन्यास गेली असता दोन्ही आरोपीनी स्वताचे शर्ट काढुन फेकुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४,२९४, ५०४, ५०६,३४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार धोंडे मो.क्र. ८६०५३२२३२२ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. जलालखेडा –** दिनांक २७/०९/२०२२ चे १४.०० वा. चे सुमारास पो.स्टे. जलालखेडा हद्दीत फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला संशयीत आरोपी नामे– मनीश बाबाराव मनकवडे, रा. जामगाव बु ता. नरखेड याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील भायवाडी शिवार येथे दिनांक १९/०९/२२ चे १५.०० वा. ते दिनांक १९/०९/२२ चे १५.३० वा. सुमारास अमित राजकुमार डवरे (मृतक), वय ३६ वर्ष, रा. नरखेड हा त्याचा एमएच– ४०/ बिझेड– ००९६ क्रमांकाच्या मोटरसायकलने नरखेड कडुन मानिकवाडा गावाकडे रोड ने येत असता मौजा भायवाडी शिवारात त्याची मोटरसायकल स्लिप झाल्याने अपघात होवुन डोक्याला डावे कानाचा वर मागचे बाजुस मार लागला. त्याय उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय नरखेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचार दरम्यान मरण पावला. मृतक याला त्याचा वाहनाला कोनत्याही वाहनाने धडक दिली नसुन मृतक हा स्वताहा त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भारधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवुन रोडवर स्वता स्लिप झाल्याने तो रोडवर पडल्याने अपघात झाला व मरण पावला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे निलेश खरडे रा. नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९, १८४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि महेश बोथले हे करीत आहे.

## अफरातफर करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा मौजा स्टेट बॅक पारशिवनी येथे दि. २७/०४/२२ ते २०/०५/२२ चे दरम्यान आरोपी नामे– धीरण उर्फे धीरज केवळ पाटील, रा.पालासावळी पारशिवनी हा भारतीय स्टेट बॅक पारशिवनी संचालक ग्राहाक सुविधा केंद्र चा संचालक असुन याने फिर्यादी नामे– संदीप नामदेव शिंदेमेश्राम, वय २४ वर्ष, रा. सोनेगाव पारशिवनी यांच्या आई वडीलाच्या बॅक खात्यातुन आपले खाद्यत्यात अनाधिकुत पणे ५,०००/–रू. व ३,०००/–रू. असा एकुन कि. ८०,००/–रू. ट्रान्सफर करून अफरातफर केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप कडु मो. नं. ९८२३७२२४१८ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील कुलदिप हॉलच्या समोर एन एच –७ रोड कन्हान येथे दिनांक २७/०९/२०२२ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामराव बाबुराव मानकर, वय ७४ वर्ष, रा.दिवटे ले आउट वार्ड नं.१० कळमेश्वर हे घराबाहेर फिरायला निघाले असता कुलदिप हॉलच्या समोर एन एच–७ रोड चेतन पानठेल्याच्या बाजुला रोडवर फिर्यादीला दोन अज्ञात आरोपी भेटले. त्यापेकी एका आरोपीने म्हटले की, 'आम्ही पोलीसवाले आहोत व त्यांनी फिर्यादीला त्याचा आय कार्ड दाखविला व त्यांनी फिर्यादीला म्हटले की तुम्ही हातामध्ये अंगठी घालु नका इथे चोरी होत आहे' व त्यांनी अंगठी काढायला लावली व फिर्यादीने दोन अंगठी अंदाजे ७.५ ग्राम किंमत अंदाजे ३७,५००/–रू. काढुन अज्ञात आरोपीच्या हातात दिले व नंतर दोघेही तिथुन पळुन गेले. त्या दोन्ही अज्ञात आरोपीने फिर्यादीस विश्वासात आणुन फिर्यादीचा विश्वासघात केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रशांत रामटेके मो.नं.९५१८९०३४८८ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा उबाळी येथे दिनांक २२/०९/२०२२ चे २१.३० वा. दरम्यान **बबुलदेव अजाबराव झोडे (मृतक), वय ६९ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, उबाळी कळमेश्वर** हे हॉलमध्ये दिवाणवर झोपले असता त्यांनी कळ फेरला त्यामुळे ते खाली जमीनीवर पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला मार लागला. दि. २४/०९/२०२२ ला त्यांचा सीटीटीएस स्कॅन केल्यावर त्यांचे डोक्यात रक्त गोटले असे दिसुन आल्याने त्यांना न्युरॉन हॉस्पीटल नागपुर येथे उपचाराकरीता नेले असता भर्ती केले ते दि. २५/०९/२०२२ रोजी २२.५९ वा. उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रशांत बबुलदेव झोडे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, उबाळी कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि राजेन्द्र पाली मो.नं. ९०११०३८६७७ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील शक्ती नगर डब्लु सी एल वाघोडा सावनेर येथे दिनांक २७/०९/२०२२ चे २२:०० वा. ते दिनांक २८/०९/२०२२ चे ०१:३० वा. दरम्यान **रामप्रसाद कूंजीलाल पंद्राम (मृतक), वय ५२ वर्ष, रा. डब्लु सी एल वाघोडा** याने पत्नी मरन पावली या कारणामूळे टेंशन घेवून शिवबमभाळीचे झाडाला पिवळया रंगाचे दुपटयाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल रामप्रसाद पंद्राम, वय २६ वर्ष, रा. डब्लु सी एल वाघोडा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास जी पोउपनि तिवारी ९६८९८९१६८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**